# जाग

विनयकुमार ज भावे

BlueRose ONE.com
Stories Matter
NewDelhi • London

**BLUEROSE PUBLISHERS**
India | U.K.

Copyright © Vinaykumar J Bhave 2025

All rights reserved by author. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the author. Although every precaution has been taken to verify the accuracy of the information contained herein, the publisher assumes no responsibility for any errors or omissions. No liability is assumed for damages that may result from the use of information contained within.

BlueRose Publishers takes no responsibility for any damages, losses, or liabilities that may arise from the use or misuse of the information, products, or services provided in this publication.

BlueRoseONE.com
Stories Matter
NewDelhi • London

For permissions requests or inquiries regarding this publication, please contact:

BLUEROSE PUBLISHERS
www.BlueRoseONE.com
info@bluerosepublishers.com
+91 8882 898 898
+4407342408967

ISBN: 978-93-7018-526-5

Cover design: Yash Singhal
Typesetting: Namrata Saini

First Edition: May 2025

# जाग

दर रोज सकाळी तनाला मनाला आत्म्याला जाणीवांच्या जगात परत घेउन येते ती जाग भूतकाळातुन वर्तमानकाळात आणणारी ती जाग शरीराच्या मनाच्या बुध्धीच्या प्रतीभेच्या सुप्त निद्रीस्त शक्तिंना उजागर करणांरी ती जाग,

जाग ही जीवनाची प्रथम अवस्था आहे इथूनच जीवनाचा पुढचा प्रवास सुरु होतो सुख दुःख प्रेम वात्सल्य अशा अनेक भावनांनी भारलेल्या प्रसंगाचा आत्म्यावर होणारा प्रभाव त्याला जाणवून देणारी ती जाग, ही कांही प्रेम कहाणी नाही वस्तुचित्रण नाही ही आहे निद्रीस्त आत्म्याला आलेली जाग व त्यानंतरचा त्याचा हूंकार आहे

आई वडिलांच्या मृत्यु नंतर कठोर वास्तवातल्या एकाकी पणांतुन झालेला हा साक्षात्कार आहे ह्यातील प्रत्येक शब्द माझ्या आईवडिलांच्या शिकवणीला अर्पण आहे

# अनुक्रमणिका

1 सुटलेली आशा.....................................................................1
2 काळ .................................................................................3
3 गारुड.................................................................................4
4 दिवाळीत हेच महत्वाचे ...........................................................5
5  कधी एकदा माझ्या मनात विचर डोकावतो ................................7
6 परवड .................................................................................9
7 शिव वंदना........................................................................11
8 काळाचे गीत .....................................................................13
9 रावण अंश.........................................................................15
10 प्रतिबिंब ...........................................................................17
11 शक्ति वंदना.......................................................................19
12 प्रीत..................................................................................20
13 आयुष्य .............................................................................22
14 पदर आईचा.......................................................................24
15 उमेद.................................................................................25
16 आवाहन ............................................................................27
17 मनाच्या लहरी.....................................................................29
18 विठ्ठल विठ्ठल .......................................................................31
19 चहा ..................................................................................32
20 अकल्पित............................................................................34
21 अजुन तु बाकी आहेस.........................................................35

22 अनमोल ठेवा ........................................................ 37
23 राम वंदना ........................................................... 39
24 पन्नास वर्षापूर्वी कुठल्याश्या स्टेशनवर .................................. 42
25 आस.................................................................. 45
26 गुढी.................................................................. 47
27 होळी व्हावी दिवाळी..................................................... 49
28 हास्य ................................................................ 51
29 मिठी तुझी............................................................ 52
30 याद ................................................................. 53
31 आयुष्यातील माणिकमोती................................................ 55
32 आले देवाजीच्या मनात .................................................. 57
33 राम गान ............................................................. 59
34 वस्त्रहरण............................................................. 61
35 नीतीची दिवाळी........................................................ 63
36 आठवण............................................................... 65
37 राममंदिर............................................................. 67
38 नियतीचा खेळ.......................................................... 69
39 मनाची उदासी.......................................................... 71
40 मी बरा आहे........................................................... 72
41 जंजाळ................................................................ 75
42 मन कथन............................................................. 76
43 जन्म ................................................................ 77
44 माझ्या आईचे घर ....................................................... 78
45 वियोग................................................................ 80
46 मानसिकता ........................................................... 81

47 कां .... गेल कुणी ....................................................82
48 कहाणी ............................................................83
49 हँव मोअर.........................................................84
50 साधना ............................................................85
51 बातम्या............................................................87
52 कवी................................................................89
53 ताकीद .............................................................90
54 अर्थ .................................................................91
55 अर्धे आयुष्य ......................................................92
56 ऐक तू...............................................................93
57 मन लहरी .........................................................95
58 छत्रपती शिवराय ................................................97
59 लबाड ..............................................................98
60 आठवणी...........................................................99
61 मन लहरी ......................................................... 100
62 माझाच दोष आहे............................................... 101
63 दान प्राक्तनाचे.................................................... 102
64 आजचा क्षण...................................................... 103
65 उपरती ............................................................ 105
66 भेट.................................................................. 107
67 कृष्ण ............................................................... 109
68 निसटलेला क्षण ................................................. 111
69 आवाहन .......................................................... 112
70 अधांतरी जग..................................................... 114
71 होऊन झुळुक तुझ्या मी, केसात गुंतुन जावे.......................... 115

72 श्रद्धांजलि ............................................................ 117
73 जनांनी स्थापलेली सत्ता जनांसाठी राबू दे ............................ 119
74 बाहु पसरले मी तुझ्याचसाठी ............................................ 120
75 बदलते जग, बदलत्या रीती ............................................. 121
76 "ज़रा" उदासी ................................................................ 122
77 सपने का एहसास .......................................................... 123
78 गूढ ............................................................................ 124
79 अदल बदल अदल बदल ................................................. 125
80 ईश कथन ..................................................................... 127



# 1
# सुटलेली आशा

निराशेच्या मध्यान्ही,
आशेची सावली
शोधतो मी,
निराशा झाली

रात्र जाई,
दिवसही येई
विझला दिवा,
पेटता होई
जर..
आशा मनीची,
कधी जर सुटली..
समजा गेली,
की गेली...



# 2

# काळ

पळे पळे तो, काळ पुढे पळे तो
गळे गळे एकएक दिन गळे तो
उरे उरे आठवांची साथ उरे रे
सरे सरे जीवन पुढे सरे रे

आली आली अन्, वर्षे गहाळ झाली
गेली गेली क्षणांची शिदोरी गेली
उरे उरे आशेची साथ उरे रे
करे करे जगण्याची साथ करे रे

असो असो जीवन शक्ति वसू दे
असो असो ईश साथीला असू दे
यावे यावे वर्षानुवर्ष, वर्ष नवीन यावे
करावे करावे स्वागत तयाचे करावे

# 3

# गारुड

नकळत सारे घडले मन हे तुझ्यावर जडले
डोळयांना डोळे भिडता नजरेचे गरुड चढले

घडली अशी की प्रीत जरा, धडधड ह्रदयी ना क्षणभर थारा
अंतरातील अंतर सरले, अद्वैत मनीचे जुळले
नकळत सारे घडले, मन हे तुझ्यावर जडले
डोळयांना डोळे भिडता नजरेचे गरुड चढले

नजरेने तुझ्या मन बेकाबू, तनामनावर ही जादू
थरथर कंपन ऊरात जरी ही,  हवीहवीशी ही जादू
नकळत सारे घडले मन हे तुझ्यावर जडले
डोळयांना डोळे भिडता नजरेचे गरुड चढले

# 4

# दिवाळीत हेच महत्वाचे

वहावे वारे मनातुन मना कडे
तेवाव्या ज्योती तेजातुन तेजाकडे
अंधाराचे प्रकाशात परिवर्तन
हेच महत्वाचे

स्वप्न व आशेच्या जीवन मार्गावर
ज्योतीचा प्रकाश खडतर रस्त्यां वर
उजळत रहाणे
हेच महत्वाचे

जीवन ज्ञानाने तम अज्ञानाचे
कंदिल प्रकाशे जग अंधाराचे
ऊजळुन जावे
हेच महत्वाचे

निराशेच्या आंदोलनात
कष्टाचे रंग भरुन जीवन फुलावे
जसे रंगांनी सजावे रुप रांगोळीचे
हेच महत्वाचे

कष्टाला साध्याचे
विचारांच्या निर्धाराचे
जणू दारावरचे तोरण, ह्रदयी बांधावे
हेच महत्वाचे

एकटेपणाची बंधने
नात्यांच्या साथीने सुटावी
भाऊबीजे चे हे सार, समजुन येणे
हेच महत्वाचे

# 5

# कधी एकदा माझ्या मनात विचर डोकावतो

प्रेमापुढे विरह
सत्यापुढे असत्य
प्रकाशापुढे अंधार
कसा सोकावतो

देवाने बनवलेल्या सृष्टीत
छाप्याला काटा कसा लागला?
का देवाला समजलच नाही
सैतानाने डाव कधी साधला

विचारल एक दिवस देवाला
तो म्हणाला....

"भुकेशिवाय जेवणाच
मृत्युशिवाय जीवनाच
निराशेशिवाय आशेच
कष्टाशिवाय विश्रांतिच
महत्वच तुला समजल नसत

प्रत्येकाचे मार्ग वेगळे
टप्याटप्यावर भोग वेगळे
सर्व क्षण एक समजू नकोस
सर्वांसाठी एकच प्रश्र्ण विचारु नकोस

नुसत्या छाप्याचे नाणे खोटे
काट्याशिवाय जिणे खोटे
सैतानाचे जग मोठे
त्याच्या जगात माझा अस्तीत्व
तुला साथ देण्यासाठी आहे
नाही तर.... मला अस्तीत्वच नाही "

# 6
# परवड

काळ बदलला युग बदलल परिस्थिती बदलेना
द्रौपदीच्या आयुष्याची परवड कांही सरेना

कृष्ण होता जो सखा झाला, तो कृष्ण आज दिसेना
त्याच्या पितांबराचा धाक, आता दुःशासना वाटेना

राजवाड्यातल्या धृतराष्ट्राला रस्त्यावरचे दिसेना
झुंडाशाहीच्या सारीपटावर शकुनी कांही थकेना

धर्म दुर्योधनातील फरक नीट पाहाताही दिसेना
चेह-यावरच्या मुखट्यामागे लपले कोण कळेना

सत्ते मत्ते लत्ते पुढे सामान्यांचे चालेना
अभिमन्युच्या मदतीसाठी फिरुन कोणी येईना

लेकीसुनांच्या रक्षणार्थ हर हर महादेव घुमेना
विनाशाचे अस्पष्ट पदरव कुणा ऐकू येईनात



## 7

# शिव वंदना

जटां जटां मधुन वाही भगिरथी, जल शृंखला
गळा तयाच्या शोभतसे सर्पहार,  कटी मेखला
डमङ डमङ डमङ डमङ डमरु नाद, शिव जप जपा
नमामि मी, नमामि मी, नमामी हे, शिवशंकरा

गो कुलात वंदनीय नंदिनीचे रूप तू
तीन्ही जगात पितृरुप, एक स्वरुप रूप तू
तव कृपेचे नाम एक, शिव शिवं जप जपा
नमामि मी, नमामि मी, नमामी हे, शिवशंकरा

तू, नीलकंठ पंकजापरी मृदुल भासतो
देवदानवासी नियम, राजदंड भासतो
तुझ्या समोर काल ही, नाम तव जप जपा
नमामि मी, नमामि मी, नमामी हे, शिवशंकरा

सर्वही कलाकलांचे तूच एक स्त्रोत हो
सर्व सृष्टी जनक आणि, विनाशकारी मात्र हो
कृतज्ञतेने जीव प्राणी नाम तव, जप जपा
नमामि मी, नमामि मी, नमामी हे, शिवशंकरा

क्षय असुन, अक्षयतेचे विषेश नाम मात्र हो
जैशी जयाची धारणा, तैसा तयांस पात्र हो
जो सूर्यनेत्र चंद्रभाल, विलय आणि प्रलय हो
जो काल, अकाल,महाकाल तोच तू शिव मात्र हो
तुझ्या समोर स्वयं काल, नाम तव जप जपा
नमामि मी, नमामि मी, नमामी हे, शिवशंकरा

जोडुन साथ शिवगणां समेत माझे मन रमो
इथेच मन हे जागले, इथेच ते शिवमान हो
लहर पवन गगन जपे आणि जपे ही धरा
शिवंशिवं निनाद आसमंती आणि चरचरा
डमङ डमङ डमङ डमङ डमरु नाद, शिव जप जपा
नमामि मी, नमामि मी, नमामी हे, शिवशंकरा

# 8
# काळाचे गीत

काळाने गीत ते कां ऊगाच गाईले
तू न तोच राहिला मी न तीच राहिले

प्रेमाचा गंध तुझा मी ऊरात बांधला
धुंद गंध तो न त्या, बंद जागी राहिला
शोधते मी गीत ते, जे मनी न राहिले

काळाने गीत ते कां ऊगाच गाईले
तू न तोच राहिला मी न तीच राहिले

आजही मनामधे ती ऊणीव भासते
प्रेमाची साद तुझी, तरीही कानी वाजते
आतुर मी शोधते ते, प्रेमभरे पाहणे

काळाने गीत ते कां ऊगाच गाईले
तू न तोच राहिला मी न तीच राहिले

डोळ्यातील प्रीत तुझी आसवांत वाहिली
प्रीत रीत कां कधी, होई वेदनेची सावली
सोडून रीत जुनी, मुक्त बंध जाहले

काळाने गीत ते कां ऊगाच गाईले
जर तू न तोच राहिला, तर मी न तीच राहिले

# 9

# रावण अंश

चेह-याची शालिनता गेली
गेला, नात्यांचा सन्मान
डिस्कोच्या तालावर नाचे
कुटुंब झंडु बाम

संस्काराची कुठली चिंता
नीतीची लावली वाट
शंभर कोटी गल्ला भरते
मुन्नीबाईची खाट

आम्हीच मांडला रस्त्यावरती
बेशरमीचा थाट
कशास आता डोळे भरती
पाहुन शूर्पणखेचा नाच

ज्या विषयाला भारतभू ने
दिला होता फुलस्टॉंप
त्याच ट्रॅंकवर गाडी चाले
यांची नॉंनस्टॉंप

स्वातंत्र्याच्या नांवाखाली
अनितीचा व्यभिचार
करा बहिष्कृत
या विषयाचे जे जे मक्तेदार

चला ऊठा आता तरी अडवु
हे जंगलचे राज
होऊन राम करुया आता
रावण अंश विनाश

# 10
# प्रतिबिंब

तरी तुला मी आज पाहतो
जणू स्वताःचे बिंब निरखतो
तेच दोष अन् गुण अवगुणही
फिरुन मी मग मज आठवतो

तुज होता त्या ध्येयाची प्राप्ती
मज वाटे जणु मीच जिंकलो
त्या क्षणाला फरक नसे मग
तु कुठली अन् मी कुठला तो



# 11
# शक्ति वंदना

मंगलकारक मंगलदायी, सकल भूतां ची तू तर आई
शरण तुला मी हे गणमाई, नत मस्तक मी तुझ्याच ठाई
जय जय हे महिषासुरमर्दिनी, नमन माझे हे शक्तिनीधे

चराचरी असे तुझीच माया, विष्णुरुपाची तु तर छाया
जीव जीवनी जिवंत प्रज्ञा, तु त्या अंतरातील आज्ञा
जय जय हे महिषासुरमर्दिनी, नमन माझे हे शैलसुते

चैतन्याचे एक रुप तु, सर्व चराचरी एकरुप तु
निसर्गगाडा तुच फिरवीशी, जीव जीवना मार्ग दाविशी
जय जय हे महिषासुरमर्दिनी,नमन माझे हे जिष्णुनुते

तु शरीराग्नी मधे राहसी, जिवनधारा सतत वाहिशी
तु मम आत्म्याची ही छाया, सदैव माझ्यासवे ही माया
जय जय हे महिषासुरमर्दिनी, नमन माझे हे शैलसुते

# 12
# प्रीत

आठवणींच्या हिंदोळ्यावर
स्वप्नांची ही सजे रांगोळी
नजरे मधे घटा दाटती
ओघळते ती प्रीत

आठवां चे फिरते जोगी
कुठुन आठवे गीत
कुठुन दिसती, विरलेली स्वप्ने
कुठे हरवले मीत
न कळे, कां तरी यांच्या साठी
तळमळते ही प्रीत
नजरे मधे घटा दाटती
ओघळते ती प्रीत

आशांच्या त्या जत्रा वेडया
नजरेने नजरेच्या खोडया
अवती भवती गोड गारवा
मनात गाई प्रेमपारवा
वास्तवाच्या दुनिये वरती

स्वप्नवत ती प्रीत
नजरे मधे घटा दाटती
ओघळते ती प्रीत

स्वप्ने रंगीत गीत धुंद ते
आज जाणवे धुके कुंद ते
आठवणींचा मनात गुंता
करतो मन घायाळ
कधी निससटले क्षण प्रीतीचे
अनोळखी ही रीत
नजरे मधे घटा दाटती
ओघळते ती प्रीत

# 13
# आयुष्य

क्षणा क्षणांनो परत आणा
कणाकणाने नेलेल आयुष्य
सुखदु:खाच्या तुकड्यामधल
मणां मणां च हरवलेल आयुष्य

जाताना मी याच डोळा
पाहिले क्षण आनंदाचे
घाईघाईने निघुन गेले
नव्हते त्यांना थांबायाचे

दु:ख कढ ही विरुन गेले
ठेऊन जखमां छातीवरती
कुरवाळीता कडु जाणीवा
कठिण क्षणांच्या अधरा वरती

परी दोन्हीच्या मधले जीवन
येते जाते तसेच विरते
ना कळे ते कधी निसटते
ते क्षण जगणे राहुन जाते

जीवन ना क्षण सुखदु:खाचे
त्यांचे येणे जाणे राहील
जीवन म्हणजे पळ मधले ते
निनांवी एकटे हर दिवसाचे

वाट पाहता जीवन जगणे
व्यर्थ करती, क्षण आजचे
क्षण आजचे ते ही वास्तव
ईश्वराच्या वरदानाचे

# 14
# पदर आईचा

आईच्या पोटातच झाली, त्या ममतेची जाण जरी
जन्म घेत सा, भास जगाचा, तव, पदरासंगे ऊरी भरी

आयुष्य लाभले, मला जरी हे, त्या पदराने वाढवले
वेळोवेळी अनेक ठिकाणी, त्या पदराने सावरले

जगभर जाऊन जरी हिंडलो,पदरा सम त्या कुणी नसे
माये खाली त्या पदराच्या, तनीमनी सुखशांती वसे

वा-यावरती पुष्प गंध जरी, सुगंधास त्या तोड नसे
कुशीत शिरता त्या पदराची, मंद सुगंधी झुळुक असे

अंगा भवती पदर ओढता, विश्वासाने ऊर भरे
कणांकणांतुन आनंदाचे, भरुन वाहती पीयुष झरे

आज अचानक त्या पदराच्या,आठवांनी जणु काळ थिजे
कुठे हरवले ते सुख माझे, काळाला त्या दया नसे

# 15
# उमेद

अजुनही या मनात काव्य लहरी ब-याच आहेत
अजुनही आसपास, गोष्टी सांगण्यासारख्या ब-याच आहेत
दुस-याच्या कथा कशाला सांगाव्या विनय
अजुनही आपल्याच जिंदगीतील, कहाण्या ब-याच आहेत

विचार कवितेतले, कांही मनात उतरत असतील
विचारांती कांही आचार बदलत असतील
मानवी आचार विचारात द्वैत फार आहे
अजुनही उलगडुन पहाण्यासारखे कैक आहे
आजकाल भावनेवर व्यवहार भारी असला तरी
अजुनही कविता, वाचणारे बरेच आहेत



# 16
# आवाहन

या पावसाच्या सरी
वात थंडगार ऊरी
अंग अंग शिरशिरी
वाहे जीवन लहरी

दर साल हा कोसळे
वीज गगनी झळाळे
सुख मनाशी तरळे
पुनर्जन्म जीवा मिळे

मन होई धुंदगार
मरगळा नाही थार
पावसात मी चालतो
जणू एकटा वाहातो

कुणी नको संग साथी
घनश्याम मेघ पाठी
हाती धरुन चालवी
जीवा लोभ मोह लावी

दर साल तू येत जा
आणि मल्हार गात जा
तना मना सुख देता
जन्म फिरूनी देत जा

# 17
# मनाच्या लहरी

मीच मी मीच मी, हा मी पणा त्यजावा
तूच तू तूच तू , हा आरोप ना गढावा
एकमेकां साथ द्यावी सत्संग साथी करावा
रडणा-या डोळां जसा, हात साथी बनावा

एक एक पाऊल पुढे, सदा जातच रहावे
कोणते पुढे कोण मागे हे कधी न पहावे
पुढच्याने पुढे असण्याचा, दंभ ना धरावा
मागल्याला मागे असण्याचा गंड न असावा

रसनेला वजन नसे तीचा तोल सावरावा
पाठीला थाप जरी धोकाही ओळखावा
कानी जे पडे ते, परत वळुन पहावे
डोळयांनीही स्थितीचा अदमास घ्यावा

आसू अन् हासू जोडी, ही जगावेगळी
साथ कधी ना, येता साथी स्वर्गाचे सुख देती
गळा पुष्पमाळा जरी, डोके पावलांवर ठेवावे
जो भू वरी स्थिर असे, तयालाच हे जमावे



# 18
# विठ्ठल विठ्ठल

विठ्ठलाची आस
विठ्ठलाचा भास
विठ्ठल चोहीकडे
दिसे मला

विठ्ठल ध्यानात
विठ्ठल मनात
विठ्ठल श्वासात
राहो माझ्या

विठ्ठलाने केले
विठ्ठलाने दिले
सुखदु:ख या जन्मी
जगावया

विठ्ठलाचे नाम
जणू चारोधाम
आधार भवसागर
तरावया

# 19

# चहा

वाटेत ती दिसली
पहाताच मनात भरली
झटकन गाडी थांबवली
पावले नकळतच वळली

गरम गरम श्वासांची हलकेच
अंगभर सरसर पसरली
मंदमंद सुवास दरवळे
ओठांची तहान सरली

पकडता हाता मध्ये
बोटेही गहिवरली
गच्च मुठी मधुन माझ्या
कणकणात उब बहरली

चवी चवीने टिपुन घेता
थेंब थेंब ही सोडवेना
संपला कटिंग चहा तो
मन ही तरी आवरेना

उगी कल्पना करु नको त्या
तु रसिका स्वप्न वेडाच्या
ऊरी लपवुन ठेवी किती
गरम कहाण्या, गरम चहाच्या

# 20
# अकल्पित

न होते तुझ्या मनात ते
न होते माझ्या मनात ही
झाले अपेक्षांचे ओझे ओढता ओढता,
झाले रिक्त माझे आंगण

वेळ काय होती ती, न सांगु शकलो कधी
न ऐकु शकलो मनीचे, न जाणु शकलो कधी
कुणा समजावी ही कथा, नजर न टाळू शकलो कधी
जरी आक्रंदते हे मन, ना समजु शकलो कधी
कां झाले रिक्त माझे आंगण

# 21
# अजुन तु बाकी आहेस

हरवून गमावून बसलो किती, तरीही
समाधान आहे की,
अजुन तु बाकी आहेस

जगण्याच्या आपाधापीत श्वास हरवला तरीही
श्वासात माझ्या,
अजुन तु बाकी आहेस

तारे ऊगवले मावळले नजरे समोर तरीही
नजरे समोर माझ्या,
अजुन तु बाकी आहेस

जीवन बैठक संपत आली तरीही
धडकत्या तालात,
अजुन तु बाकी आहेस

जग नजरेने मी कफल्लक तरीही
बघ मजपाशी,
अजुन तु बाकी आहेस

व्यवहारात सगळ्यांनी माझी बोली लावून झाली
आता फक्त,
अजुन तु बाकी आहेस

कुणाच्या जाण्याने फरक पडला नाही कधीही
कारण  माझ्यापाशी,
अजुन तु बाकी आहेस

# 22
# अनमोल ठेवा

जगण्याचा अनमोल ठेवा | पक्षीमात्रांकडुन जरूर घ्यावा ||
सांज ढळता उपवास करावा | रात्री बेधुंद जागर टाळावा ||

सूर्यास्ताला दिवस सरावा | सूर्योदयाचा आनंद लुटावा ||
पोटाला पचते तेच गिळावे | विनाकारण लोभ टाळावा ||

आपल्या पिलांना आपणच शिकवावे | दुस-यावर अवलंबुन कां रहावे ||
हवा तेवढाच चारा घ्यावा | बाकी इतरांसाठी सोडुन द्यावा ||

आपल्या समाजात मिसळुन रहावे | दुस-यांचाही सन्मान करावा ||
मतभेदात मनभेद नसावा | वेळोवेळीच मनभेद सावरावा ||

रात्री शांत विसावा शोधावा | दिवस कार्यरत असावा ||
सकल निसर्ग घरकुल असावे | ईश्वरी निर्मितीचा आनंद घ्यावा ||

पिलांना अपुल्या सक्षम करावे | पंख फुटताच हात सोडुन द्यावा ||
जीवनकार्य संपत आले की | शांतपणे एकांतात जगाचा निरोप घ्यावा



# 23

# राम वंदना

राम राम राम कहो
राम राम राम सुनों
राम राम राम जपे
पायो वो स्वर्ग रे || 1 ||

राम राम राम पुजे
राम राम राम न दूजे
राम राम चरणकमल
राम करें ध्यान रे || 2 ||

अभिमानी डूब जात
पत्थरभी तैर जात
राम नाम जिनके साथ
सफल उनके काम रे || 3 ||

रामनाम जापजाप
बजरंगी गात गात
परबत उखाडलात
रामनाम करे काम रे || 4 ||

राम सूर्य

राम चंद्र

राम लहर

राम पवन

लहर पवन गगन गात

राम नाम जाप रे || 5 ||

जग छूटो घर छूटो

छूटो म्हारो गांव रे

राम पायो करम भयो

सफल भयो जनम रे || 6 ||

छोड दे तु झूटी आस

छोडो तुम मोह रे

राम एक एक नाम

हरी गुण तुम गावो रे || 7 ||

हे sssss

रामनाम सत्य एक, रामनाम प्रीत एक

राम देखते ही पापी भागे ही भागे

रामनाम जतन करें रामनाम मनमें भरे

राम भक्तीभाव उसे लागे ही लागे रे भाई

राम भक्तीभाव उसे लागे ही लागे रे || 8||

कितना जतन करो कितना न राम मानो

राम देख राम प्रीत जागे ही जागे
सुनो कहे रामदास, जिसका मन रामधाम
उसका जीवन गान जागे ही जागे रे भाई
उसका जीवन गान जागे ही जागे रे भाई || 9||

# 24

# पन्नास वर्षापूर्वी कुठल्याश्या स्टेशनवर

एक कुत्रा झोपला होता वजनाच्या मशिनवर
स्वत:ला सांभाळत हलकेच जाऊन
दहा पैशाच नाण मशिन मधे दिल सरकवून

भविष्य
वजनाच्या तिकीटा बरोबर सहा तिकीटात
त्या श्वान गोत्राच भविष्य कथन मिळाल

तिकीट.. 1
आपल भविष्य उज्वल आहे.
गोत्राला राजयोगाची खात्री आहे.
आपली व आपल्या सग्यासोय-यांची भरभराट होईल

तिकीट 2
जनता पायी रस्त्यावरुन
तर आपण कार व विमानातुन फिराल
गाडयांचे ताफे असतील
सरकारी इतमामान लाभतील

तिकीट 3
कामक-यांपासुन मारेक-यां पर्यंत
सर्वच आपल्यआ मुठीत असतील
न्याय अन्याय ठरविण्याचे अधिकार मिळतील

तिकीट 4
महामंडळापासुन मंत्र्यापर्यंत
आपल्याच गोत्राचे लोक असतील
आपल्या आवाजाने आसमंत घुमेल
आपल्या दातांचा दरारा असेल
आपले शेपूट आपला मानदंड असेल
जितकी जास्त हलेल तितका जास्त सन्मान मिळेल

तिकीट 5
आपले भाऊबंद एकमेकात लढतील
सगळे मिळून एकाच्या मागे लागतील
एका मागुन एक सगळ्यांचे नंबर लागतील

तिकीट 6
समर्थक गोंजारत रहातील
विरोधक दगडधोंडे मारत रहातील
पण मिळणा-या हाडकांच्या आशेने आपले जातकुळ
माणसांना चिकटुन राहील
खेळत व खेळवत राहील

मदतीला पुढे येईल
रात्ररात्र जागत राहील
तरीही श्वान गोत्रातले ते
दाराबाहेर ठेवण्याच्याच लायकीचे राहतील

# 25

# आस

कठिण दुर्गम रस्त्यावरचे चालणे धावणे तुझे असो
त्याच रस्त्यावर तुझ्यामागे थकलेले तनमन माझे असो

वाटेवरती यशापयशांच्या वेळोवेळी सीमा हो
तीथेच माझ्या शक्तिचीही शेवटची परिसीमा हो

बहरलेल्या ताटव्यांचे दृष्य विहंगम तुझे असो
भरलेल्या आनंदाश्रुने पाणावलेले डोळे माझे असो

उमेदींसह साहसाला खंबीरतेची साथ असो
एक एक स्वप्न साकारताना भारलेले मन तुझे असो

शाश्वत यशोमंदिराचे चमचमते कळस तुझे असो
त्यावरील आशेचे शेवटचे किरण माझे असो



# 26

# गुढी

चैतन्याची लडी
आकांक्षांची छडी
अथक प्रयत्नांची ऊंच ऊडी
चला ऊभारु....
नवीन भारताची नववर्षाची गुडी

घेऊन धर्माची पताका
अस्तीत्वाचा उद् घोष
पुर्नर्निमार्णाचा जोष
चला ऊभारु.....
नवीन भारताची नववर्षाची गुडी

होऊन मानवतेचे प्रतिबिंब
कवटाळुन पुण्यकर्माची सिद्धी
जाळुन विषमतेची रुढी
चला ऊभारु.....
नवीन भारताची नव वर्षाची गुडी



# 27
# होळी व्हावी दिवाळी

लागो होळी मन्मनात|
साधनेच्या कुंपणात||
खड्ड्यात समर्पणाच्या|
जळो अहंकार तयात||1||

जळो वासनांचे देणे|
जळो इंद्रियांचे मागणे||
सत्कर्माचे गाठी योग|
यावी मना मनाला जाग||2||

जनजनास मैत्र लाभो|
वैराग्य योग ही जागो||
षड्रिपुबंध खाक होती|
अशी होळी हर मनात||3||

हे यज्ञस्वरुप व्हावे|
मना ईशस्वरुप दिसावे||
व्हावी ऐसी एक होळी|
जणू मुक्ततेची दिवाळी||4||



# 28
# हास्य

तुझ्या मनाच्या गाभा-यात माझे असणे आहे
माझे लाजणे आणि तुझे थबकणे आहे
शब्दात न मांडलेल्या भावना मी जाणून आहे
की इथे माझे हसणे आणि तीथे तुझे बहकणे आहे

# 29
# मिठी तुझी

तुझ्या पहिल्या मिठीने कमाल केली
न मी माझा उरलो न माझी,माझी सावली

तुझ्या चाहत्यांच्या गर्दीत तु मला मिठी मारली होती
प्रत्येक नजर माझ्यावर, प्रत्येक व्यक्ती हैराण होती

तुझ्या पहिल्या मिठीची धग जीवनभर तशीच राहीली
आयुष्यातल्या हर एक गर्मीवर मात करत राहीली

तुला मिठीत घेईन प्रेम करीन
एकदा माझे ऐकून तर बघ..
मी मनधरणी हजारदा करीन

# 30

# याद

असे मनामधे वास | हर माणसाशी खास
याद जाईना जाईना |मन राहीना राहीना
मनामधे किती पीळ | सुख वेदनांचे वळ
याद जाईना जाईना | मन राहीना राहीना ||1||

किती आठवांचे खेळे |मना मना मधे मेळे
कधी पौर्णिमेची सर | कधी ग्रहणाची कर
याद वागणे रुजवी | याद बहाणे जागवी
कधी साथ राखायाला | कधी साथ टाकायाला ||2||

कधी जीव तोडवीते |कधी भेट घडविते
कधी ईश्वराच्या संगे |कधी माणसाच्या अंगे
आठवांचा गत काळ ...
मनामधे करी घोळ | सुख वेदनांचे वळ
याद जाईना जाईना |मन राहीना राहीना ||3||

जग जगे यादां संगे |मन रमे पूर्वरंगे
किती करी आठवण |उठ पूर्वेचा तो सण
सोड आठवांची साथ |करी नवीन पहाट

हर दिवशी तू जाण |जीव जगणे महान ||4||

नको करु याद यादा |रातदीन जाती सदा
जैसे गेले ते जाऊ दे |भाव नवीन पाहू दे
मन बालकाचे ठेव |हर प्रेमाचे माहेर
असू दे तू साथ त्याची |करु नको मन माती ||5||

ईश मना मधे राही |हर माणसाशी जाई
मनातले पीळ सोड | सुखा येईल बहर
याद जाईल जाईल |मन राहील राहील ||6||

# 31

# आयुष्यातील माणिकमोती

आज अचानक वळणवाटेवर | मागे वळून पहात असता
स्तब्ध मजला करीत असती |सापडलेले मणिकमोती ||1||

एक पिता मजसाठी जगला | हर गरजांना पुरुन उरला
हाती धरुन, मज चालवता |कधी न दमला, कधी न दमला ||2||

एक जननी, ईश्वररुपे | घेउन आली जगता मध्ये
खंत नसे जरी कांही चुकले | पाही, चांगले, माझ्या मधले ||3||

एक सहोदर जी भासे मज | मम मातेची जणू सावली
समजुन घेई जीवनातले | कष्ट दु:ख, वाट्याला आले ||4||

एक बंधू जो चालत येई | साक्षीदार जो मम वाटेवर
हर ठेचे वर मनास भासे |साथ तयाची आहे आजवर ||5||

तीचे हास्य जणू जीवन माझे | पाहुन मन हे हलके होई
पत्नी बनुन जी, संग चालली | हर एक जागी हर एक ठाई ||6||

खेळ खेळण्यासाठी जमवुन | मित्रांसंगे डाव मांडला
हसता रुसता जवळीक झाली | न सुटणारी बैठक जमली ||7||

या सर्वांचे पुष्पगुच्छ जो | कुटुंब म्हणुनी जगती जाणा
कुणी न एकटा कुणी न परका | साथ घेऊनी देऊनी बरं कां! ||8||

आशेचे चमचमते मोती | सर्व कष्ट जे सुसह्य करीती
सर्व जग जरी टाकुन गेले | धीर धरी तु, हेच सांगती ||9||

ईश्वराकडे, न, अधिक कांही | मागायाचे राहुन गेले
माणिकमोती जे मिळाले | प्रकाश वाटच दावून गेले ||11||

# 32
# आले देवाजीच्या मनात

आले देवाजीच्या मनात | पाहु काय चाले जनात
सुजलांम सुफलांम या धरतीवर | मानव आहे नां खुष जीवनावर ||1||

खुषीत येऊन देवाजीची स्वारी | उतरली या भूतला वरी
फिरत असता पाही कसा | मानव धावे शर्यतीत जसा ||2||

विचारे जगदीश्वर एकास थांबवून | कां रे बाबा कां राही धावून?
म्हणे, कष्ट गरजा कशा संपेना | मानवा जीवनी स्वस्थ ठेवीना ||3||

मानस पुत्राची ही कहाणी | ऐकुन व्यथित झाला तो चक्रपाणी
तथास्तु! म्हणुन दूर केली |सर्व व्यथा संपवून दिली ||4||

कानो कानी गोष्ट पसरली | गर्दी माणसांची देवदारी ऊसळली
एका मागुन एक व्यथा आणि कथा | ऐकुन थकला श्रीहरी आता ||5||

पळावे म्हणाला इथून दूरदूर | परी सोडेना गर्दीचा पूर
देव पुढे मनुष्य मागे...
देवाचीही सुटका होईना.. |माणसा हातीही देव मिळे ना ||6||

थकुन भागुन तो जगदीश्वर | महादेवाचा करतसे जागर
भोलेनाथ एक मार्ग दाखवी | मानवाच्या मनातला कोपरा सुचवी ||7||

सगळी कडे जाईल हा | मनात कधी न पाहिल हा
तु तिथेच रहा स्वस्थ रहा | या जंजाळातुन मुक्त रहा ||8||

ईश मनातच असला तरी |मानवाला सापडेना
मंदिर मंदिर फिरतसे | मनात कधी डोकावत नसे ||9||

करण्या ईश्वराची प्राप्ती | दूर कशाला उगाच जाशी
भावे म्हणे ह्रदयी ईश्वर | एकदा मनात डोकाऊन पहा तर ||10||

# 33


# राम गान

आयुष्याचे माझ्या गुंफे सूर आणि ताल
राम रंगी मन हे नाचे होऊनी बेभान ||1||

एक तारी घेऊन हाती भक्ति गीत गातो
एक एक सूर शिकवी अयोध्येचा नाथ ||2||

मन हे माझे राम रंगी राम सूर ताल
गीत वाजे -हदयी माझ्या जणू स्वर्ग गान ||3||

वेळ बैठकीची सरते गान करी पूर्ण
वाजु दे -हदयी माझ्या गोड तुझे नाम ||4||



# 34

# वस्त्रहरण

वेळ एक त्या याज्ञसेनेवर | महारथी ही पतीत झाले
दुष्टमतीच्या अगोचरास्तव |अपमानाने व्यथीत झाले
वस्त्रहरण होताना तीजला | सुष्ट श्रेष्ठ ना कामी आले
लाज नारीची खेळ नसे हा,| राजभवन हे पतीत झाले||1||

सर्व मार्ग संपले तीचे तर | एकच मार्ग, मागे उरला
कृष्णकृष्ण हा, धावा करणे | मंत्र हा तीने मग वापरला
धिक्कारत मग त्या कौरवांनां | स्पष्ट इशारा तीने वदला
गरीब अबला मज ना समजा | मी भावा सांगावा दिधला ||2||

मम पतीबळ आज क्षीण जरी | भाऊ माझा वीर असे
नराधमांना पापी जनांना | माफी त्याच्या कडे नसे
ना समजा तुम्ही, अबला मजला | मी एक हिंदू नारी असे
सर्व कौरवां वरती माझा | एक मुरारी भारी असे ||3||

सांगावा माझा मिळता तो | क्षण एकही दवडे ना
अनवाणी तो धावत येईल | बंधु माझा शस्त्र कसे
लाल नेत्र रागाने होता | इथे कुणाला माफी नसे
शस्त्र सुदर्शन धारण करता | काळ ही तव ना लपवू शके ||4||

ओढी पदर हातुनी तीच्या तर | लज्जा तीळ तीळ सुटत असे
नारी अबला लाज राखण्या | कृष्ण जाप मग करीत असे
कृष्ण लीला अगाध ऐसी | कुणी न जाणे कुणी न समझे
हाक कृष्णेची कानी येता | मुरलीमनोहर कूट रचे ||5||

साडी वरती साडी खेचे | पदरा वरती पदर दिसे
मूर्छित तो दु:शासन पडला | विवस्त्र द्रौपदी करु न शके
कृष्ण भावभक्तिचा भुकेला | त्याला श्रद्धा प्यारी असे
भरजरी साडीचे, कर्ज फेडतो | लीला तयाची न्यारी असे ||6||

# 35
# नीतीची दिवाळी

श्रीराम आज मंदिरी
प्रतिक्षा शतकांची संपली
स्थापना नीतीची साजिरी
दिवाळी अयोध्येत साजरी

मन हे तुझी अयोध्याअसू द्या
धर्म नीतीची जाण राहू द्या
सत्य सनातन धर्म वाढु द्या
नीतीची ही जीत साजिरी
दिवाळी अयोध्येत साजरी

घेता तुमचे नाम रघुवीरा
पैलतीराचा मार्ग साजिरा
आनंदाचे उमंग उठती
हर मनात साजरी
जीत ही नीतीची साजिरी
दिवाळी अयोध्येत साजरी

किती काळ प्रभू वाट पाहीली
हर दिवसाची रात्र जाहली
आज कुठे नव प्रभात झाली
अश्रुंची परीसीमा झाली
जन आनंदे व्याकुळ झाली
हर मनात साजरी
स्थापना नीतीची साजिरी
दिवाळी त्रिखंडात साजरी
दिवाळी अयोध्येत साजरी

# 36

# आठवण

याद जाता जात नाही
वेळ गेली येत नाही
आठवांच्या रौद्र लाटा
अन् मनी मग दुखतो काटा

जरी वेदना थंड होती
परी अचानक जागताती
प्रेमभावना ओढ लावी
की फिरुन ती भेट व्हावी
जरी नसे हे साध्य आता
जरी मनाला समज आता
भावनांचे दोर ठेवती
याद ह्रदयी मंद तेवती
शांत प्रकाशी मन शांत जरी
कधी उठती या रौद्र लाटा
अन् मनी मग दुखतो काटा



# 37
# राममंदिर

ये कैसा दुर्भाग्य था
शतकोंका वनवास था
स्वामी तीन्ही लोकों का
बेघर, मौन, बेबस था

भक्तोंका विलाप रहा
असुरोंका आलम रहा
झुटलाते रहे राम को
हिंदू सनातन मजबूर रहा

छुटी नही फिरभी आस
छोडा नही ईश्वरका साथ
कहते रहे नही रुकेंगे
राम मंदिर वहीं बनाऐंगे

बहती नजरें देख रही है
सत्य सनातन ऊथ्थान की
हो रही है प्रभात प्यारी
रामराज्य के शुरवात की

राममंदिर बनके रहा
उन सबके अहंकार पर
पूछते थे कब बनाऐंगे
तारीख नही बताऐंगे

खोलो आंखे अंजन भरलो
राममहल है आंखोंमे भरलो
हो सकता है सुधर जाओगे
राम न्याय को समझ जाओगे

वनवास सहन कर हर भक्त को
बजरंग बली बना दिया
कली पुत्रों के अहंकार को
सप्तपातालमें दबा दिया

है आनंदकी बेला आई
अयोध्या वैकुंठ प्रतिमा पाई
रामधाम है शरयु तट पर
सत्ययुग की आगाज आई

# 38
# नियतीचा खेळ

चंद्र सूर्य आणि तारका
कुणी मांडला हा डाव
कुणी जोडला मेळ
नियंत्याला त्या नांव नसावे
नियतीचा हा खेळ

जो तो अपुल्या जागी फिरतो
अखंड अन् अव्याहत झुरतो
नियम दिलेले तोडू शकेना
कुणी जोडला मेळ
नियतीचा हा खेळ

परी मज हर दिन नवीन वाटे
सुख दु:ख जगा वेगळे भासे
जग चाले जरी एकच वाटे
जरी तसाच दिन रोज पहाटे
मनात कां हा घोळ
कुणी जोडला मेळ
नियतीचा हा खेळ

समजुन घेऊ ही रचना तर
समजुन घ्या हो खेळ
मना मनाचे भाव वेगळे
परिस्थितीसम भान वेगळे
जो तो पाही अपुल्या अंगे
समजु घेइ अनोख्या  ढंगे
जरी निसर्ग सारखा, जिकडे तिकडे
मन हे वाही इकडे तिकडे
तेच जोडीना मेळ
हा पण नियतीचाच खेळ

# 39

# मनाची उदासी

जेंव्हा कधी मनाचा परकेपणा जाणवतो
जेंव्हा कधी जगाचा उपरेपणा दुखावतो
जेंव्हा कधी आपलीच अनोळखी व्हावी
तेंव्हा जीवनाचा परत नवीन अर्थ शोधण्याची शर्थ करावी

सुटतात कधी जेंव्हा हातुन कांही नाती
सुकतात कधी जेंव्हा मनातील वाती
नजरेला नजरेची ओळख ही न रहावी
तेंव्हा जीवनाचा परत नवीन अर्थ शोधण्याची शर्थ करावी

मनाच्या मळभावर विचाराने मात करावी
वेळ काळ बदलतात वा-याचे झोत ही दिशा बदलतात
परत बोलावलेल्या हाकेने परके ही परत येतात
आपलेपणाची गाठ घट्ट धरुन ठेवावी
अडकलेल्या वळणावरुन नवीन वाट शोधावी
जीवनाचा परत नवीन अर्थ शोधण्याची शर्थ करावी..
... परत परत नवीन अर्थ शोधण्याची शर्थ करावी

# 40

# मी बरा आहे

नातु माझा गणिते सोडवतो
इंग्रजीची स्पेलिंग बनवतो
सकाळी थंडीवा-यात शाळेला जातो
हा क्लास तो क्लास दिवसभर तो बीझी आहे
पाहुन त्याची धावपळ
मी आहे तीथे बरा आहे

मुलगा माझा ब्रेकफफास्ट सोडून
धावत पळत आँफिस गाठतो
रात्री प्रेझेंटेशनस् बनवण्यात
झोपेच खोबर आहे
पाहुन त्याची धडपड
मी आहे तीथे बरा आहे

पत्नी माझी स्वयंपाकात बीझी
मोलकरणी मागे लागी
लागल संपल पहात रहाणे
सगळयांसाठी खपत आहे
पाहुन तीची ओढाताण

मी आहे तीथे बरा आहे

नको रे बाबा ते बालपण
नको रे धावपळीच तरुणपण
नको ती स्त्रीत्वाची परवड
खाऊन पिऊन झोप काढुन
साठी नंतर......
मी आहे तीथे बरा आहे



# 41
# जंजाळ

न सावरे तुझ्याने तुझे मोह जाळे
तु माधवा हाती देई सोपवुन सारे
जे जमेना तुला ते, तो सावरुन घेईल
केशव तुझे जंजाळ सोडवून देईल

# 42

# मन कथन

समजावता समजेना जर
समजावणे... सोडून द्यावे||
बोलविता सहाय्ये येई ना जर
बोलावणे... सोडून द्यावे||
बाल बने समर्थ तयाला
सदैव टोकणे... सोडून द्यावे||
जनाधारी विरोध विचारी, जरी थोडे
कलह तयांशी... सोडून द्यावे||
वये वाढता जन मागुनी बोलती
मनदु:ख तयाचे... सोडून द्यावे||
राम करे सर्व मनी हा भाव
चिंता ऊद्याची... सोडून द्यावे||
शक्ति युक्ति न करे पूर्ती
अपेक्षा ठेवणे... सोडून द्यावे||
वये जाता, जात राहणे अटळ
मोजणे आता... सोडून द्यावे||
भावे म्हणे सुखदु:ख एकाच ठाई
अतिविचारे झुरणे... सोडून द्यावे||

# 43

# जन्म

जग हे सोडुन देशी कसा
मग परमात्म्याला बघशी कसा
जर इथेच कुणी न मनात भरले
तर तीथे आपले शोधी कसा

हे पाप अन् पुण्य तोली कसा
ही तर इथली एक रचना असे
हर युगात बदले ही रचना
मग एक जन्मी तु जाणी कसा

हे भोग भोगणे इथला वसा
तु सोडून सगळे जाशी कसा
जर ईश्वर निर्मित सर्व इथे
त्या सर्वां नांवे ठेवी कसा

हा जन्म दान ईश्वरी असे
तु त्याला स्वप्न म्हणशी कसा
हे जीवन इथेच भोगुन जाणे
न भोगुन जन्म दवडशी कसा

# 44
# माझ्या आईचे घर

उंच डोंगरा पल्याड
माझ्या आईचा तो गांव
वाट चिंचोळी चिंचोळी
माझ्या पावलांना ठाव

वाटे वर नदी नाले
कधी वळण उतार
घनदाट झाडी मधे
कधी मोकळे पठार

वाटेवर रामेश्वर
राही डोंगरी डोंगरी
पानफुलां गंधकोषी
आणि मोकळया आकाशी

वाटेवर साथ त्याची
ह्या जीवन प्रवासी
पाठीवर हात ठेवी
करी सार्थ जीवनासी

माझ्या आईचे ते रुप
डोळा भरुन पहाया
मन आतुर आतुर
जीवा शिवा भेटवाया

जरी घर तीचे तीथे
जरी घर माझे इथे
माझ्या मना मधे तीचे
मूर्त स्वरुप स्वरुप
मूर्त स्वरुप स्वरुप

# 45
# वियोग

आयुष्यातील रंग सारे बघता बघता विटुन गेले
बहरलेले पानफुलांचे, ताटवेही सुकुन गेले
स्वप्नां मधले साथी सारे मागे पुढती निघुन गेले
रंगपटा, वरील सारे, दिप आजला विझुन गेले
वेळेचा हा खेळ पहाता, अचल ऊभा मी मूक जाहलो
दूर सरकता तांडा माझा भरल्या डोळी पहात राहिलो

जाग न आली पूर्ण अजुन की, दिवस मावळतीला गेला
चाल न जमली अजुन तरीही, जीवनकाल संपून गेला
पान पान गळुन गेले, तरु तरु ही जळुन गेला
ओढ तरीही अजुन ऊद्याची, तनामना वर ठेऊन गेला
शब्दही आता गीत न बनती स्वप्न सारे विरुन गेले
जीवनातले सगेसोयरे वेळ सरता निघून गेले
तरी अजुनही, इथे मी असा, वळणावरती जणू ठसा
वेळेचा हा खेळ पहाता, अचल ऊभा मी मूक जाहलो
दूर सरकता तांडा माझा भरल्या डोळी पहात राहिलो

# 46
# मानसिकता

भारत बोलताना वाटते लाज
इंग्रजी नांव "इंडिया" चा माज
मायबोली झाली नकोशी
इंग्रजी आँटी ला चढवतात साज

आपले झालेत नकोसे
रडती परकीयां च्या दारोदार
राज्य हवे इथल्या प्रजेवर
पण परदेशी हिता चे हे राखणदार

गुलामांची मानसीकता
स्वातंत्र्याची सवय नाही
अजुनही इंग्रजी हुकुमत मनावर
अस्मितेची कदर नाही

नको हे हुकमाचे ताबेदार
आता फिरुन आपलेच "अबकी बार"
हाकलून देऊन या गुलामांना
करु गुलामी हद्दपार

# 47
# कां .... गेल कुणी

सत्य सांगुन, सत्य वदवून
असत्या मागे, गेल कुणी...

प्रेम रंगवून, प्रेम बनुन
मोहा मागे, गेल कुणी...

खेळ खेळत, खेळात रमवुन
खेळ करुन, गेल कुणी...

आस लावुन, आस देऊन
आस होऊन, गेल कुणी...

हास्य फुलवुन, हसत ठेऊन
अश्रु सुकवुन, गेल कुणी...

चंद्र दाखवून, तारे जोडुन
जमिन सोडुन, गेल कुणी...

# 48
# कहाणी

समां समां इथे जवान मंद मंद ही हवा
न जाणो कोणती कहाणी छेडतो हा मारवा

दूर दूर कुठेतरी, रातराणी बहरते
लेवून प्रीत गंध तोच, चांदरात ही ढळते
अधरां वरती अधर जागवे, शरीरी नव गारवा
समां समां इथे जवान मंद मंद ही हवा
न जाणो कोणती कहाणी छेडतो हा मारवा

साद घालीतो मनाला भावनांचा चांदवा
या क्षणाची साथ जोडे जीवनाला रंग नवा
नाते नवीन पुर्ण होऊनी मनी भरे नव गारवा
समां समां इथे जवान मंद मंद ही हवा
न जाणो कोणती कहाणी छेडतो हा मारवा

# 49
# हँव मोअर

सर्वत्र एकच शोर हँव मोअर हँव मोअर
नीतीची साथ टाकून , बेशरमीची लाज टाकून
सावा वर शिरजोर चोर
हँव मोअर हँव मोअर

मला जास्त हवे, पण तुझ्या हक्काचे देणार नाही
मी तरआई बापाला पण ओळखत नाही
तू मग कुठला थोर ?

चालत नाही ही अनीतीची वाट
चोरा वर कुणी ना कुणी मोर
मनाची टोचणी रुतलेली टाचणी
न दिसे कधी ईश्वराची डागणी
पापाचे परिमार्जन इथेच कर इथेच कर
हँव मोअर हँव मोअर

# 50
# साधना

भक्त ईश्वराकडे असाच पाही
दीन व्याकुळ होतसे, तो ठाई ठाई
मिळावे दर्शना म्हणून तळमळावे
प्रसादे ईश्वरा, मागे मागे पळावे

जगी सर्व सुखी असे दोन राजे
परमबोधी, स्थितप्रज्ञ मन जिथे विराजे
अन्यथा असेही मिळती जागोजागी
तयांच्या मना नसे जाग जागी

जसा तो व्याकुळ भुकेने तहाने
नाम मार्गावरी तो, त्याच वेदनेने
हीच एक खूणगाठ बांधून ठेवी
जसा तळमळे भक्त, तो तशी वाट दावी

जयाला ईशाचे आवाहन झाले
तयाला सर्व, भक्तिमार्ग प्राप्त झाले
करी प्रार्थना करी रे ईश भक्ति
तशी तया संग जुडे भक्तिशक्ती

नको रे न व्हावे तुझे नाम खोटे
मनावरी जनांच्या मायेची पूटे
तरी तुला तयांचा विसर न व्हावा
कृपेने तुझ्या भक्ति मार्ग दिसावा

# 51
# बातम्या

ख-या बातम्या, खोट्या बातम्या
घडलेल्या बातम्या, घडवलेल्या बातम्या
आंधळया डोळयांनी पाहिलेल्या बातम्या
आंधळया वाचकांनी वाचलेल्या बातम्या
पै किंमतीच्या लायकीचे
पैशाने मांडलेले
भ्रमाचे डोंगर भ्रमाचे महाल
आंधळा विश्वास आणि भ्रमाचे जाल

हरामखोरांच्या नाँटी बातम्या,
नाँटी लोकांनी बनवलेल्या बातम्या
लबाडांच्या तोंडीच्या गुगलीच्या बातम्या
बंद दरवाज्या मागच्या बातम्या
सत्य राहिल बाजुला चुगल्यांची चुगली
तरीही म्हणवती स्वत:ला बातम्या
पै किंमतीच्या लायकीचे
पैशाने मांडलेले
भ्रमाचे डोंगर भ्रमाचे महाल
आंधळा विश्वास आणि भ्रमाचे जाल

उरलेल्या बातम्या, पेरलेल्या बातम्या
लपवलेल्या बातम्या, शोधलेल्या बातम्या
किलकील्या दारां मधून टिपलेल्या बातम्या
गद्दारांच्या बातम्या, सरदारांच्या बातम्या
विचारांशी फारकत आणि आचाराच्या बातम्या
जिवंत आत्म्याने भोगलेल्या बातम्या,
तर मेलेल्या आत्म्याने बनवलेल्या बातम्या
पै किमतीच्या लायकीचे
पैशाने मांडलेले
भ्रमाचे डोंगर भ्रमाचे महाल
आंधळा विश्वास आणि भ्रमाचे जाल

# 52
# कवी

जन संसारी बदलती रुपे, जशी जशी तो पहातो
दु:खी कष्टी होऊनीया, तो मग, आपल्यांपाशी जातो
तीथे ही जेंव्हा, त्याच रीती, पाहुनीया हळहळतो
भेट होऊन स्वमनाची, स्वत: समोर तो येतो
दुर्बलतेवर कधी स्वत:च्या, रडतो आणि हसतो
तोच तारा, आसमंती मग, बनुन कवी जगमगतो

# 53
# ताकीद

लावू नका झाडे, नीयत नाही तुमची
पर्यावरण संवर्धन, ताकद नाही तुमची
मागतो एक दान झोळीत टाका..
निसर्गाने वाढवलेली झाडे, तोडू तरी नका
पहा बघता बघता निसर्ग हा फुलेल
वैराण जागेच नंदनवन आपोआपच घडेल.

तुम्ही लावाल एक झाड
कापायला मागाल परमिशन चार
दुष्टप्पीपणाने धरती, बनत आहे जाळ
दोष मानवांचा हा ...
कु-हाडीचा दांडा गोतास काळ

# 54
# अर्थ

गीता मधले अर्थ माझ्या, तुला कधी कळलेच नाही
मांडलेल्या शब्दांशी नाते, तुझे कधी जुळलेच नाही
घातलेली साद कधी काळजा भिडलीच नाही
भेटा या जीवाशिवाची घडवूनही घडलीच नाही

# 55
# अर्धे आयुष्य

कां जगावे आयुष्य अर्धे ?
कां रोज अर्धवट मरावे ?
मौन आणि बोलणे
स्वत:चे स्वत:च निवडावे

जेंव्हा कांही हवे स्वत:ला
कां ना स्पष्ट बोलावे
नको असेल तर मग मात्र
गुळमुळीत कशास रहावे

अर्धे ऊत्तर नको आणि
प्रश्नही अर्धवट कां ठेवी
अर्ध्या अधु-या आशांची
स्वप्ने अधुरी कां पाही

अर्धा रस्ता कुठे न नेई
तू तर एक पूर्ण जग
अर्धे आयुष्य ना मिळाले
जे मिळाले पूर्ण जग

# 56
# ऐक तू

दे करुन आज सार्थ
मन्मनातील जाग आग
युद्धभूमीची पुकार
ऐक तू.....

आन बान शान ठेव
शिरतळाची भेट ठेव
काळाची ही हाक प्रखर
ऐक तू ....

वेळ येता जीव देणे
वेळ येता जीव घेणे
कृष्ण वचन सार्थ करी
आज तू ....

युद्ध शौर्य हे प्रमाण
जो लढे महान जाण
मरण क्षूद्र हे प्रमाण
देच तू ....

करुणा भाव वीर भाव
हार जीत एक घाव
हर ललाटी रक्त लाल
खेच तू ....

# 57
# मन लहरी

त्यांच्या मना जणी वागला, तोच चांगला चांगला
तोच मनातुन जाई, जर स्वेच्छेने वागला
चूक आणि अपयश, पाहूनच मिळे यश

जे दुबळया रडवी, कैसे ते मोठेपण
खोट सांगे जन मानेना, ऐसा घडवी तु मना
माझ्यासाठी काय केले,वेळ सरता ते गेले
कुठे निस्वार्थी सापडे, जो तो, त्याचा स्वार्थ जडे

गुरु आणि जीवनात, एक फरक तू जाण
गुरुशिकवी अन् घेई, जीणे घेऊन शिकवी
तुझी परीक्षा परीक्षा, तुझी परीक्षा परीक्षा



# 58
# छत्रपती शिवराय

आईच्या छायेत, राहूनी मायेत
तलवारीची धार पेलली.. तू
झेलूनी अंगार, पेटवून ऐल्गार
सह्याद्री कातळ तापवले.. तू
तू माझा मान, तू माझी शान
तुझ्या विना गर्व नसे कुणाचा
स्वराज्य स्थापुन सुराज्य आणून
जनमनात स्थापित तू माझा राजा
मम मनात स्थापित तू माझा राजा

....शिवरायांना त्रिवार वंदन....

# 59

# लबाड

हेवा द्वेष सुटत नाहीत
याच्या कुजक्या मतीचे
साथ राहुन गोड बोलती
हे तर आतल्या गाठीचे

चेहरा कुणाचा लोभस गोंडस
सदैव भाक साथीचे
वेळ बदलता रंग बदलती
हे तर आतल्या गाठीचे

मैत्री त्यांचा धर्म असुनही
जरी यांच्या, नशीबी मार्ग सुखाचे
फसवून सा-या भोळे बनती
हे तर आतल्या गाठीचे

नको अशांशी गाठ पडावी
ओळख ठग हे जातीचे
गोड बोलण्या फसु नको तू
हे तर आतल्या गाठीचे

# 60
# आठवणी

आयुष्याचा खेळ सावळा,
गोधळ आता विरुन गेला
आठवणींचे बोजे मात्र तो
साठवणींमधे ठेऊन गेला

डोळया पुढले दिवस स्वत:चे
बघता बघता ऊडून गेले
ध्यास सुटेना आस सुटेना
ओढ निर्रथक ठेऊन गेले

# 61
# मन लहरी

विनाकारण काळजी, जणू सावकारी देण
किती फेडता फेडता, पळ पळ वाढे ऋण

किती जगणे राहीले, कुणा माहित  जाहले
कशा वेळ दवडीतो, कशा काळजी करीतो

रस्त्यावर किती वेग,
बँकेमधे किती ठेव, जिथे तीथे हो मर्यादा..
परी चांगल्या विचारी, आभाळाची उंची सारी
कशा वेळ दवडीतो, मग वाकडया विचारी

मन सर्वात श्रीमंत, जाणे हे, विचारवंत
येता कठिण समय, शांत राहून संयम
जेंव्हा घोंगडे कामी येई, कशा रेशमाची घाई

नको जास्त मागु मागु, टोपली खाली राखू
पूर्वायुषी कां झगडावे, पूर्वरंगी कां लढावे
आला तो क्षण आपुला, जगावे तू, कां मरावे
कां वेळ दवडीतो, मरण, स्वत:चे पहातो

# 62
# माझाच दोष आहे

आयुष्य धकाधकीचे संधी अनेक आल्या
त्या सर्व वेचताना, कधी हातात त्या निमाल्या
मज ना समजले कधी, अन् किती काय सांडले आहे
दुसरे कुणी नसे हा माझाच दोष आहे

नात्यांच्या गुंतागुंती किती बंध गुंफलेले
कधी मीच मांडलेले, कुणी मज संग जोडलेले
उमजले नसेल जर कांही, नकळत सुटले आहे
दुसरे कुणी नसे हा माझाच दोष आहे

असे दूर दृष्टी तरीही, जवळचे मज दिसेना
जवळचे कधी पहाण्या, मज नजर सापडेना
अशाने जीवनाचे किती क्षण विखरले आहे
दुसरे कुणी नसे हा माझाच दोष आहे

गोष्टी किती कराव्या असे खंत या मनाला
परी सवड सापडेना अतीव्यस्त ह्या जीवाला
वेळेत वेळ शोधी, असमर्थ जर मी आहे
दुसरे कुणी नसे हा माझाच दोष आहे

# 63

# दान प्राक्तनाचे

मी जीवनात माझ्या नेहमीच गात आलो
हे दान प्राक्तनाचे मानुन मुक्त झालो

ही भूक भावनांची रसनेचे सोस सारे
त्यातुनीया निघाले नात्यांचे गोषवारे
वेळेच्या वास्तवाने तापुनीया निमालो
हे दान प्राक्तनाचे मानुन मुक्त झालो

माझ्या, तुझ्या मनाच्या, त्यांच्या तीच्या जनांच्या
गरजेतुनी स्वत:च्या हा खेळ मांडलेला
खेळात जीवनाच्या रंगुनी शांत झालो
हे दान प्राक्तनाचे मानुन मुक्त झालो

कोणा कधी कुणाशी जवळीक फार झाली
त्या नेक भावनेला भरपूर साथ केली
ही ठेव मालकाची समजुनीया निघालो
हे दान प्राक्तनाचे मानुन मुक्त झालो

# 64

# आजचा क्षण

वेळ पुढची ही अज्ञात
वेळ मागची ही पश्चात
क्षण आजचा हा सत्यात
सोडू नको ही वेळ
आजच्या क्षणाचाच हा खेळ

गत काळाच्या फिरती सावल्या
वाटा निबीड मिळत राहिल्या
उजेड वाटेवर, या क्षणाचा
या क्षणी जी भरेल झोळी
ते न सापडे पुढच्या वेळी
सोडू नको ही वेळ
आजच्या क्षणाचाच हा खेळ

या क्षणातील जीवन सत्य
या क्षणातील दुनिया वास्तव
या क्षणातील ऊभारी सारी
हाच क्षण, सर्वांवर भारी
सोडू नको ही वेळ

आजच्या क्षणाचाच हा खेळ

या क्षणाच्या छायेत जीवन
या क्षणाची हीच कहाणी
फक्त या क्षणाकडेच, येई मागता
हाच क्षण ईश्वरीय दाता
सोडू नको ही वेळ
आजच्या क्षणाचाच हा खेळ

सोडू नको ही वेळ
आजच्या क्षणाचाच हा खेळ

# 65
# उपरती

वेळ कसा गेला कळलच नाही
वेळेच गणित कधी जुळलच नाही
काळाला ही कळीकाळाची मिठी
कळीकाळाच्या मिठीत शिरत गेलो उमजलेच नाही

वेळच नव्हता रस्ता पहायला
रस्ताच शिकवत गेला मला जगायला
वेळेच्या वेगाने डोळे उघडलेच नाहीत, उघडलेच नाहीत
वेळेच गणित कधी जुळलच नाही

त्यांना आपले आपले म्हणता
ते आपल आपल करत गेले
काळाचे संगसाथी हळुहळु दुरावत गेले
बेरीज वजाबाकीत कुठे चूक झाली
शोधतो पण सापडतच नाही, सापडतच नाही
वेळेच गणित कधी जुळलच नाही

किती घेतले किती दिले
जमाखर्च कधी केलाच नाही
ज्यांनी घेतले त्यांना जमेची यादच नाही
उपरतीच्या क्षणांना परत फिरणे नाही, परत फिरणे नाही
वेळेच गणित कधी जुळलच नाही

म्हणूनच सांगतो वेळीच सावध व्हा
देणा-याचे हात घेता घेता घेणा-याची दानतही पहा
देणा-यालाही पुढे जगायचे असते
सर्वांबरोबर रहायचे असते
स्वतः कडे थोड थांबून पहा, थोड थांबून पहा
वेळेच गणित वेळेवरच सोडवून पहा

# 66
# भेट

तुझी भेट कधी कधी, भेटून खळखळून हसण कधी कधी
माझ्या मनाची घालमेल, जाणवेल तुला कधी कधी

दूर न जावो एकमेकांपासुन, या जगाच्या कोलाहलात
मनातील भीती श्वास अडवून, जीव कातर करे, कधी कधी

नको टाळू कधी प्रश्ण हे, नको टाळू नजरेची भेट
न असे व्हावे जिवंतपणी, मन घाबरते कधी कधी



# 67
# कृष्ण

कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....
कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....

खोडी करे तोच कृष्ण, रास रचे तोच कृष्ण
गोपीकांचे प्रेम कृष्ण कौरवांचा काळ कृष्ण
कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....
कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....

मुरलीधारी कृष्ण कृष्ण
मयुरपंखधारी कृष्ण
चक्रधारी कृष्ण कृष्ण
गोवर्धनधारी कृष्ण

कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....

कृष्ण जाण कृष्ण मान
कृष्ण काळ कृष्ण वेळ
कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....
कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....

पुतनाचे रुप भेदी
यशोदासी दावी विश्व
कालियाच्या माथ्यावर
नृत्य करी तोच कृष्ण

कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....
कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....

द्रौपदीचा सखा कृष्ण
अर्जुनाच्या संगे कृष्ण
कालयवना मारी कृष्ण
कौरवांच्या सेनेला एकटाच भारी कृष्ण
पांडवांच्या विजयाचा मार्ग दावी तोच कृष्ण

कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....
कृष्ण कृष्ण कृष्ण कृष्ण .....

# 68
# निसटलेला क्षण

काय म्हणून तो तसाच मनात घोळत राहीला
तो क्षण रात्रभर एकटाच झुरत राहीला

सुटलेल्या त्या क्षणाची आता फक्त खंत बाकी
कोण तु एकटा इथे, इथे तर सर्वच एकाकी
एकाकीपणाच्या वाटेवर एकटाच फिरत राहीला
काय म्हणून तो तसाच मनात घोळत राहीला
तो क्षण रात्रभर एकटाच झुरत राहीला

सर्वांनाच दोन क्षण मिळतात मिलनाचे सुखवायला
तुझ्या भेटीत तो क्षण कमी पडला रीझवायला
नंतरच्या प्रवासात तो क्षण मनात भिरभिरत राहीला
काय म्हणून तो तसाच मनात घोळत राहीला
तो क्षण रात्रभर एकटाच झुरत राहीला

# 69

# आवाहन

आकाशातल्या ता-यांची अपेक्षा नको
जमिनी वरच्या वा-यांची पर्वा नको
स्वातंत्र्याची पहाट आणायची आहे तुला
चल उठ सखी बरोबरीने चालायच आहे तुला

हे आजच करायच आहे वाट पहायची नाही
भळभळणा-या जखमा़च औषध आसवांत नाही
मनाच्या ऊभारीत जीवनाचे मूळ आहे उडणा-या केसात नाही
असाही एक स्वर्ग आहे जो पुरुषांना वश नाही
स्वत:च्या अस्तीत्वाची जाण जागवायची आहे तुला
स्वातंत्र्याची पहाट आणायची आहे तुला
चल उठ सखी बरोबरीने चालायच आहे तुला

तुझी किंमत या जगाला समजलीच नाही
तुझ्यात धगधगणारी आग आहे फक्त शरीर सौंदर्यच नाही
तु एक वास्तव आहे फक्त प्रेम कहाणीच नाही
तुझे स्वत:चे अस्तीत्व आहे फक्त तारुण्यच नाही
समाजाच्या समजुतींचा घोळ बदलायचा आहे तुला
स्वातंत्र्याची पहाट आणायची आहे तुला

चल उठ सखी बरोबरीने चालायच आहे तुला

गावा गावात पेटत आहे चिता तुझी
कर्तव्याचे बदलणारे रुप नाही ओळख तुझी
विषच आहे स्त्री सुलभ रुपे तुझी
वेळ बदलायची आहे स्वतंत्र जगायचे आहे तुला
स्वातंत्र्याची पहाट आणायची आहे तुला
चल उठ सखी बरोबरीने चालायच आहे तुला

तोडून प्रथेच्या भिंती पारतंंत्र्यातुन नीघ
स्त्री सुलभ भावनांच्या बंधनातुन नीघ
धर्माच्या खेचलेल्या अडचणीतुन नीघ
जे प्रेम कैद बने त्या प्रेमातुन नीघ
रस्त्यावरचे अंगारच नाही तर मोहाची फुलही टाळायची आहेत तुला
स्वातंत्र्याची पहाट आणायची आहे तुला
चल उठ सखी बरोबरीने चालायच आहे तुला

तोड स्वत:वरची सारी बंधने तोड
तुला जी अडवे ती शपथही तोड
समाजाचे अन्यायाचे पाशही तोड
पुरुषी अहंकाराचे खेळही तोड
एक वादळ बनुन झंझावात आणायचा आहे तुला
स्वातंत्र्याची पहाट आणायची आहे तुला
चल उठ सखी बरोबरीने चालायच आहे तुला

# 70
# अधांतरी जग

अधांतरी जग अधांतरी जग
अधांतरी जग अधांतरी जग

कुणा न ठाउक स्थैर्य कसे ते
उगते सरते जग बदलते
ढळत्या बुडत्या कसली स्थिरता
सर्व चराचर अखंड फिरते

कसले येणे कसले जाणे
कसले हरवणे कसले मिळणे
कुणा न आदि कुणा न शेवट
काळा संगे नुसती फरफट

विश्व स्वताःचे तुला मिळावे
आनंदाचे मोल कळावे
सर्व खेळ हा क्षणा पुरता
हे आयुष्याचे मर्म कळावे

# 71
# होऊन झुळुक तुझ्या मी, केसात गुंतुन जावे

त्या मंद मंद सुवासे, आसमंत दरवळावे
व्हावे कधी तुझ्या त्या ओठांची लाल लाली
गालावर कमी कुठे गं, लाजेची ती झळाळी
कां मी पहावे चंद्रा, ना त्या असा सुवास
तु फक्त माझीच आहे, आगळा विश्वास खास

घेऊन हात हाती, पहावे उद्याचे स्वप्न
स्वप्नांतुनी फुलावे एक, आगळेच विश्व
जीथे तुला नी मजला कुठले नसावे बंध
न्यावे मनाला तीथे, जीथे प्रीतीचा सुगंध



# 72
# श्रद्धांजलि

सूर सारे शांत झाले
सातसुरांचे लेणे गेले
अजुन वेडी आशा होती
भूक सुरांची बाकी होती

अखंड आनंदाने भरले
याने या मनाचे घागरे
एक गीत, जर कधी न आठवे
वेडेपीसे मन, शोधात पाठवे

तुझ्याविना तर कधीच नव्हता
हा जन्माचा प्रवास ढळता
दिल्यास बनवून गीत भाकरी
जरुर पुरतील, या वाटेवरी

तुझ्या शिवाय आता जगणे
हे ही या नशीबाला आले
जाऊ दे माझा मार्ग ही
आता किती कोस बाकी ऊरले



# 73
# जनांनी स्थापलेली सत्ता जनांसाठी राबू दे

संविधानाचा सन्मान मनामनात ठसु दे
बदलत्या युगाचे प्रतिबिंब राज्यकारभारात पडु दे
या धरतीचा इतिहास सामान्यास कळू दे

जाऊ दे ते सर्वसगळे, प्रगतीच्या मार्गात येईल
जाऊदे ते सर्वसगळे, समाजास वेठीला घेईल
असो ती व्यवस्था, जी गुणवत्तेला न्याय देईल
स्वार्थाच्या पलिकडले उमजून, समाजास भान येईल

आज परत लोकतंत्र मंत्र, आसमंती घुमू दे
आज परत हिंदवी संस्कृतीचे संवर्धन होऊ दे
अडत्यांची पकड बुडत्यांवरुन जाऊ दे
गणतंत्र व्यवस्थेला नव झळाळी लाभू दे
सर्व देशभक्त भारतीयांना गणतंत्र दिवसाच्या शुभेच्छा

भारतमाता की जय !

# 74
# बाहु पसरले मी तुझ्याचसाठी

स्वप्नांची उघडली दारे, तुझ्याच साठी
तुझ्याच पावली तुझ्याच मागे
दूर दूरवर येईन मी तुझ्याचसाठी

उंच उंच डोंगरा मधे लपुन जाऊ
धुंद वा-यासवे वाहून जाऊ
श्वासात भरुनी तयाला चल गीत एक गाऊ
देऊन मनाला मनाच्याच हाती
येईन दूर दूरवर मी तुझ्याच साठी

# 75
# बदलते जग, बदलत्या रीती

बदलत्या भावना, बदल हा किती
एका क्षणात जोडी, एका क्षणात बोलवी
एका क्षणात घडवी, क्षणार्धात भेट

आकाशी माणसे, अवकाशी अंतरे
आभासी बंधने, मनातील अंतरे
निसटते जीवन, निसटते रंग
निसटत्या काळवारातुन, निसटत्या आशा

सुखदु:ख एकामागुन एक, विरह साथ एकामागुन एक
एका मागुन एक वर्षे जाती, एका मागुन एक वर्षे येती
एका मागुन एक पान उलटते, एका मागुन एक जीवन सरते

निरंतर बदल हा निवांत झेलुया
येणा-या वर्षाचे स्वागत करुया

# 76
# "ज़रा" उदासी

"ये कौनसा मुकाम है"

रंग डोळ्यासमोर पसरलेले
जीवन बेरंग आहे

आनंदमेळे भरलेले
आनंद निसटतो आहे

कष्टसाध्याने वाट साधलेली
आज ऊर्जेसाठी कुढत आहे

नव उन्मेशाने जग पसरलेले
स्वत: मधे मी आखडत आहे

सगळ्यांसाठी मार्ग असलेले
वाट स्वत:ची शोधतो आहे

जीवन शुन्यातुन निर्मिलेले
शुन्याकडे चालले आहे

# 77
# सपने का एहसास

सपनों के घर में, सपनों का मंजर
सपनों के वादियों मे, सपनोंका शहर
सपनों में आना, सपनों में खोना
सपनों मे कई बार, रात रात जागना
सोचता हूँ ये जिंदगी है या, सिर्फ सपनों कि आस
ये जिदगी भी लगे, एक सपने सा एहसास

# 78

# गूढ

जीवनाच्या वाटेवर
श्वासांचे येणे जाणे आहे
दु:खांची वळणे आणि
सुखाचे बरसणे आहे
पुढे कोण गळेल काय मिळेल
विचार करणे व्यर्थ आहे
नीयतीच्या मनातले गूढ
समजणे अशक्य आहे
कितीही मोहरा गोळा केल्या
पोटासाठी फक्त दोन दाणे आहे.

# 79

# अदल बदल अदल बदल

उसळलेल्या समुद्राची
धीर गंभीर सागरा बरोबर
शांत नीलमयी नभांची
गरजणा-या काळयाभोर मेघां बरोबर
अदल बदल अदल बदल

धरणीवर पांघरलेल्या हिरव्याकंच गालिच्याची
शुष्क कोरड्या लाल काळया माळा बरोबर
निसर्गचक्रात वेळोवेळी रुप बदलणा-या झाडापानांची
आपल्याच कुशीत फुललेल्या फुलांफळां बरोबर
अदल बदल अदल बदल

निसर्गातली अदल बदल जीवनातही डोकावते
परतत्या वेळे बरोबर देहभानही हरपते
बालपण तारुण्यांची वृद्धापकाळा कडील वाटचाल
नवीन जीवनाशी होणा-या ओळखीसाठी धास्तावते
अविनाशी आत्म्याची फक्त रुपे बदलतात
जीवनाची जीवना बरोबर
अदल बदल अदल बदल



# 80
# ईश कथन

मी तोडतो भेद मधले
तु बांधतो भिंती
मी जोडतो भाव मधला
तु दाखवी भिती

मी वागवी समान सगळयां
तु वाढवी जाती
मी करी एकत्र सकलां
बनवी तु जमाती

ईश एक प्राण एक
एक जरी ही धरा
तुच बनवी तुच वाढवी
वेगवेगळया धर्मा

माणसा रे माणसा
कशास खातो माती
मोजलेले दिन तुझे अन्
मोजलेल्या राती